पुण्य नगरी

# डॉ. मगदूम फार्मसी कॉलेज येथे स्नेहसंमेलन उत्साहात

**जयसिंगपूर : प्रतिनिधी**

डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेजचे स्नेहसंमेलन उत्साहात झाले. या सोहळ्यास अभिनेत्री व नृत्य दिग्दर्शिका डॉ. राजश्री खटावकर प्रमुख पाहुण्या होत्या.

यावेळी डॉ. जे. जे. मगदूम ट्रस्टचे चेअरमन डॉ. विजय मगदूम यांनी विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी एआयवर प्रभुत्व असायला हवे, असे सांगितले. व्हाईस चेअरपर्सन ॲड. डॉ. सोनाली मगदूम यांनीही मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शीतलकुमार पाटील यांनी केले. शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ झाला. यानंतर स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे सादरीकरण केले. डॉ. जे. जे. मगदूम इंजिनिअरिंग कॉलजचे प्राचार्य डॉ. हरिशानंद के. एस., कॉलेजचे उपप्राचार्य सतीश किलजे, डॉ. प्रियंका गायकवाड, डिप्लोमा विभागप्रमुख प्रा. सौ. एस. व्ही. मगदूम आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन प्रा. सौरभ समडोळे, प्रा. काशीनाथ हुलवान यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ऐश्वर्या पाटील, विद्यार्थी प्रतिनिधी हार्दिक कोळी यांनी केले.

Kolhapur Edition
Mar 02, 2026 Page No. 6
Powered by: erelego.com